रे.दि.मु.नं. ११८/१३

पुष्पा शिवाजी कुदळे,
विरूध्द
श्री. गुलाब अब्दुल मुजावर

## निशाणी ५ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या कलम ३९ नियम १ व २ नुसार दाखल करण्यात आला आहे.

२. **वादी यांचे थोडक्यात कथन असे की,** प्रस्तुतचा अर्ज हा कसबे वाई, ता.वाई जि.सातारा येथील रविवार पेठेतील शेतजमीन रि.स. नं. ४३९/६ त्याचा जुना स.नं. ३७४/६ क्षेत्र ०.२७ आर आकार ३ रू. ९४ पैसे पा. आ. ०.६२ पैसे या मिळकती बाबत दाखल केला असून, सदर दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी स्वत: अगर इतरामार्फत वादीचे दावा मिळकतीत असणारे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींना देणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादींनी पुढे असे कथन केले की, दावा मिळकत मुळची पीर मुबारक पीर तर्फे वहिवाटदार राजमहंम्मद सुलतान तर्फे खरोद्दीन कुतबुद्दीन काजी यांची आहे. सदर मिळकत सन १९४५–४६ सालापासून बाबू हरी कुदळे कूळ हक्काने वहिवाटीत होते व त्यांचे पश्चात वादी वहिवाटीत होते व आहेत. बाबू हरी कुदळे हे दि. १५/०९/१९७८ रोजी मयत झालेले आहेत. वादी नं. १ ही मयत बाबू कुदळे यांचा मयत मुलगा शिवाजी यांची पत्नी असून वादी नं. २ ते ४ हे मयत मुलगा शिवाजी यांची मुले आहेत. मयत बाबू हरी कुदळे यांचे वारस श्री. शंकर आणि मयत शिवाजी यांचेत

दि. २३/०५/१९८८ रोजी वाटप झालेले आहे. वाटपाप्रमाणे दावा मिळकत शिवाजी वहिवाटीत होते आणि मयत शिवाजीच्या पश्चात वादी हे वारसाहक्काने दावा मिळकत प्रत्यक्ष वहिवाटीत होते व आहेत. शिवाजी हा दि. ३१/०९/१९८९ रोजी मयत झाला. दावा मिळकतीला मयत बाबूच्या पश्चात ए.कु.मॅ म्हणून बाबूचा मोठा मुलगा शंकर यांची नोंद फे.नं. १७००१ ने झालेली आहे. अशाप्रकारे दावा मिळकत ही वादीची वडिलोपार्जीत मालकी हक्काची होती व आहे.

**३.** दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध अगर कब्जा व वहिवाटी नव्हती व नाही. दावा मिळकतीचे संपूर्ण रेकॉर्ड विचारात घेता दावा मिळकत सन १९४५—४६ सालापासून बाबू हरी कुदळे कूळ हक्काने वहिवाटीत होते व त्यांचे पश्चात वादी वहिवाटीत होते व आहेत. मयत बाबूच्या पश्चात शंकर आणि मयत शिवाजी यांचेत दि. २३/०५/१९८८ रोजी वडिलोपार्जीत मिळकतींचे वाटप झाले. सदर वाटपाप्रमाणे सदरची मिळकत शिवाजी यांचे वाटपात दिलेली आहे. सबब सन १९८८ पासून मयत हा वादातील मिळकत वडिलोपार्जीत मालकीहक्काने वहिवाटत होता. दि. ३०/०४/२०१३ रोजी दावा मिळकतीत उन्हाळी भुईमुगाचे पीक होते ते पीक काढत असतांना प्रतिवादी हे दावा मिळकतीत येवून वादीचे कब्जे वहिवाटील हरकत करू लागले. परंतू वादी यांनी प्रतिवादी यांची हरकत न जुमानता दावा मिळकतीची वहिवाट करत असतांना प्रतिवादी नं. २ यांनी वादी नं. २ ते ४ यांना मारहाण केली तसेच जीवे मारणेची धमकी दिली. त्याबाबत रितसर वाई पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविली. वादींचा कर्ता पुरूष शिवाजी हा मयत आहे. वादींची आर्थिक परिस्थीती बेताची आहे. उलटपक्षी प्रतिवादी हे

खुनशी वृत्तीचे आहेत. प्रतिवादी यांनी या मे.कोटर्ात कॅव्हेट अर्ज दाखल केला आहे. अशा परिस्थतीतीत कायदा हातात घेवून दांडाव्याने प्रतिवादींनी वादीचे दावा मिळकतीमधील पूर्व हक्कदारांचेपासून असणारे शांततामय सुखद कब्जेवहिवाटीस हरकत अगर अडथळे निर्माण केलेस वादीचे कशानेही न भरून येणारे नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादींचे विरूध्द निरंतराची ताकीद देणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले.

४. सदर कामी प्रतिवादींना हजर रहाण्याकरिता न्यायालयामार्फत समन्स काढण्यात आले. प्रतिवादी हे सदर दाव्याचे कामी हजर झाले. प्रतिवादी यांनी नि. ५ वरील म्हणणे नि. १३ ला दाखल केले.

५. **प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन असे की,** वादींचा दाव्यातील व तुर्तातुर्त ताकीद अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असून तो या प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. तसेच प्रतिवादींनी वादींची सर्व कथने पूर्णपणे नाकारलेली आहेत.

६. **खरी वस्तुस्थिती अशी की,** रि.स.नं. ४३९/६ याचा जुना स.नं. ३७४/६ ही मिळकत पिर मुबारक पिर तर्फे वहिवाटदार राजमहंमद सुलतान खैरूद्दीन खुदबुद्दीन काझी यांची होती. सदरची मिळकत देवस्थान इनाम वर्ग ३ ची आहे. सदर मिळकतीमध्ये वहिवाटदार राजमहंमद सुलतान तर्फे खैरूद्दीन खुदबुद्दीन काझी यांची सदर मिळकतीमध्ये वविाट होती. दि. २३/०२/३२ रोजी राजमहंमद सुलतान तर्फे सय्यद खैरूद्दीने खुदबुद्दीने काझी यांनी अब्दुल व सिराज रहिमान मुजावर यांना रक्कम रूपये २५०/— ला दावा मिळकत व इतर मिळकती

कब्जे गहाण दिल्या होत्या. तेंव्हापासून सदर मिळकतीमध्ये अब्दुल व सिराज मुजावर यांचा सन १९३२ सालापासून कब्जा होता. अब्दुल व सिराज हे मयत झाले आहेत. अब्दुल यास उस्मान, कदीर गुलाम असे वारस होय तर सिराज यास महामुद असे वारस होय. अब्दुलचा मुलगा उस्मान मयत असून त्याला चार मुले वारस होती. अब्दुल व सिराज यांचेमध्ये फार वर्षापूर्वी वाटप झालेले असन इतर मिळकती सिराज यांचे वाटपात गेलेली असून वाद मिळकत ही अब्दुल याचे वाटपात आलेली आहे. अब्दुलची तीन मुले उस्मान, कदीर, गुलाम यांचेमध्ये वाटप होवून दावा मिळकत ही प्रतिवादी नं. १ याचे वाटपात आलेली आहे. अशा प्रकारे दावा मिळकतीमध्ये वादी यांची कधीही वहिवाट नव्हती व नाही. दि.२३/०२/३२ रोजी राजमहंमद सुलतान तर्फे सय्यद खैरूद्दीने खुदबुद्दीने काझी यांनी अब्दुल व सिराज रहिमान मुजावर यांना कब्जेगहाण दिलेनंतर ३० वर्षाचे आत त्यांनी सदर मिळकत सोडवून घेतली नाही. त्यामुळे अब्दुल व सिराज हे इव्हीडन्स ॲक्ट आर्टीकल ६१ नुसार सन १९६२ मध्ये मालक झालेले आहेत. त्याप्रमाणे ७/१२ रेकॉर्ड सदरी सुध्दा अब्दुल सिराज रहिमान मुजावर यांची इतर हक्कता नोंद आहे.

७. सन १९४९ मध्ये फेरफार नं. ८१६६ ने बाबु हरी कुदळे यांची कुळ कायद्याप्रमाणे नोंद झालेली दिसत आहे. सदर मिळकतीमध्ये अब्दूल व सिराज यांची वहिवाट असतांना सन १९४९ मध्ये राजमहंमद सुलतान तर्फे खैरूद्दीन खुदबुद्दीने काझी यांची वहिवाट असणे शक्यच होत नाही. त्यामुळे बाबू हरी कुदळे हे राजमहंमद सुलतान तर्फे खैरूद्दीन काझी यांचेकडून कुळ हक्काने कब्जा घेवूच शकत नाही. कारण सन १९३२

साली राजमहंमद सुलतानतर्फे खैरूद्दीन काझी यांनी अब्दुल व सिराज यांना गहाण मिळकत दिलेली असल्यामुळे सदर मिळकतीमध्ये अब्दुल व सिराज यांचा कब्जा होता. त्यामुळे सदरचा फेरफार हा पूर्णपणे बेकायदेशीर आहे. दावा मिळकतीशी वादी याचा काही संबंध नव्हता केवळ फेरफार नं. ८१६६ ने रेकॉर्डसदरी बाबू हरी कुदळे याची कुळ कायदा कलम ३अ प्रमाणे नोंद झालेली होती तशीच नोंद पुढे राहिल्यामुळे सदर मिळकतीचे रेकॉर्डसदरी वादी व त्यांचे पूर्वज यांच्या नोंदी ओढल्या. मात्र सदर मिळकतीमध्ये कधीही वादी तसेच त्यांचे पूर्व यांचा कब्जा नव्हता व नाही.

८. प्रतिवादी नं. १ ची बहिण शाबीरा मकबुल मुलाणी हिने दावा मिळकतीचे रेकॉर्ड सदरी स्वत:ची नोंद होणेकामी तंटामुक्तीकडे अर्ज दिला व सदर तंटामुक्तीचा अर्ज वादी यांच्या पाहण्यात आल्यामुळे वादी यांनी सदर रेकार्ड काढून रेकॉर्डला वादी यांचे पूर्वजांची नोंद आहे व त्याचा फायदा घेता आला तर पहावा या एकाच उद्देशाने दाव्याची रचना केली आहे. प्रतिवादी नं. १ चे वडिल अब्दुल मुजावर यांचे नावे खाते नं. ३५ होता. सदर खाते नंबरला सुध्दा दावा मिळकतीची नोंद आहे यावरून सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा कब्जा होता व आहे हे दिसून येईल. खरीप मोसमात भुईमुगाचे पिक हे जुन मध्ये केले जाते व ते ऑक्टोबर मध्ये काढले जाते, तर उन्हाळी भुईमुगाचे पिक हे फेब्रुवारी मध्ये केले जाते तर ते जुन मध्ये काढले जाते. एप्रिल महिन्यात भुईंमुगाचे पिक कधीही काढले जात नाही. यावरून वादी हे भुईमुगाचे पिक काढत होते व त्यास प्रतिवादी हरकत करत होते हे म्हणणे खोटे आहे असे दिसून येते. यावर्षी भुईंमुगाचे पिक केलेले नव्हते तर प्रतिवादी यांनी ज्वारीचे पिक केलेले होते व ते

काढलेले आहे. निव्वळ ७/१२ चे रेकॉर्डला भुईमुंग पिकाची नोंद असल्यामुळे वादीने भुईमुग पिक केलेले होते असे खोटे नमूद केले आहे. वरील सर्व कारणांचा विचार होवून वादीचा दावा खर्चासह रद्द करणेत यावा.

९. दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधी केलेल्या कथनांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझया विचारार्थ आले. मी खाली दिलेल्या कारणास्तव त्यांच्या समोर निष्कर्ष नोंदविले.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रथमदर्शनी प्रस्तुत अर्ज किंवा दावा वादींच्या बाजूने आहे हे वादी सिध्द करतात काय ? | नकारात्मक |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे हे वादी सिध्द करतात काय ? | नकारात्मक |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होउ शकते हे वादी सिध्द करतात काय ? | नकारात्मक |
| ४ | काय आदेश ? | खालीलप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ ते ३ करिता.

१०. तिन्ही मुद्दयाची कारणमिमांसा पुनरावृत्ती टाळण्याकरिता मी त्यांची चर्चा एकत्रीतरित्या करत आहे. मी वादींचे विद्वान वकील श्री.आर.आर.यादव तसेच प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.एस.एस. बामणे यांचा युक्तीवाद ऐकला.

## दाखल केलेली कागदपत्रे

**११.** वादींनी आपली बाजू सिध्द करण्याकरिता नि. ७ ला वाई येथील स.नं. ३७४/६ चा सन ३२—३३ ते ४५—४६ चा ७/१२ चा उतारा, नि. ८ ला वाई येथील स.नं. ३७४/६ चा सन ५०—५१ ते ५२—५३ चा ७/१२ चा उतारा, नि. ९ ला वाई येथील स.नं. ३७४/६ चा सन ६३—६४ ते ७८—७९ चा ७/१२ चा उतारा, नि. १० ला वाई येथील स.नं. ३७४/६ चा सन ९९—२००० ते १०—११ चा ७/१२ चा उतारा, नि. ११ व १२ ला वाई येथील स.नं. ४३९/६ चा ७/१२ चा उतारा, नि. १३ ला वादी नं. १ पुष्पा शिवाजी कुदळे यांचे नावचा खाते नं. १३०७ चा खातेउतारा, नि. १४ ला वादी नं १ यांचा खाते नं. १५९४ चा उतारा, नि. १५ ला वाई येथील फेरफार नं. १७००१ चा उतारा, नि. १६ ला वाई येथील फेरफार नं. १९०६८ चा उतारा, नि. १७ ला वाई येथील फेरफार नं. १८९११ चा उतारा, नि. १८ ला वाई येथील फेरफार नं. ८१६६ चा उतारा, इत्यांदी उतारे दाखल केलेले आहेत.

**१२.** प्रतिवादींनी आपली बाजू सिध्द करण्याकरिता नि. २७ ला कसबे वाई ता.वाई येथील अब्दुल रहमान मुजावर याचे नावचा खाते उतारा, नि. २८ ला कसबे वाई येथील फेरफार नं. ३७४/६, २०४३, ३७४/७, ३७४/८ इत्यांदी उतारे दाखल केलेले आहेत.

**१३.** दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधी केलेली कथने व दाखल केलेल्या दस्तऐवजावरून असे दिसून येते की, वादींनी आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा कसबे वाई, ता.वाई जि. सातारा येथील रविवार पेठेतील शेतजमीन रि.स.नं. ४३९/६ त्याचा जुना

स.नं. ३७४/६ क्षेत्र ०.२७ आर आकार ३ रू. ९४ पैसे पा. आ. ०.६२ पैसे या मिळकती बाबत दाखल केला असून, सदर दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी स्वतः अगर इतरामार्फत वादीचे दावा मिळकतीत असणारे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादींना देणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादींनी पुढे असे कथन केले की, दावा मिळकत मुळची पीर मुबारक पीर तर्फे वहिवाटदार राजमहंम्मद सुलतान तर्फे खरोद्दीन कुतबुद्दीन काजी यांची आहे. सदर मिळकत सन १९४५—४६ सालापासून बाबू हरी कुदळे कूळ हक्काने वहिवाटीत होते व त्यांचे पश्चात वादी वहिवाटीत होते व आहेत. बाबू हरी कुदळे हे दि. १५/०९/१९७८ रोजी मयत झालेले आहेत. वादी नं. १ ही मयत बाबू कुदळे यांचा मयत मुलगा शिवाजी यांची पत्नी असून वादी नं. २ ते ४ हे मयत मुलगा शिवाजी यांची मुले आहेत. मयत बाबू हरी कुदळे यांचे वारस श्री. शंकर आणि मयत शिवाजी यांचेत दि. २३/०५/१९८८ रोजी वाटप झालेले आहे. वाटपाप्रमाणे दावा मिळकत शिवाजी वहिवाटीत होते आणि मयत शिवाजीच्या पश्चात वादी हे वारसाहक्काने दावा मिळकत प्रत्यक्ष वहिवाटीत होते व आहेत. शिवाजी हा दि. ३१/०९/१९८९ रोजी मयत झाला. दावा मिळकतीला मयत बाबूच्या पश्चात ए.कु.मॅ म्हणून बाबूचा मोठा मुलगा शंकर यांची नोंद फे.नं. १७००१ ने झालेली आहे. अशाप्रकारे दावा मिळकत ही वादीची वडिलोपार्जीत मालकी हक्काची होती व आहे. परंतू प्रतिवादींनी आपल्या कैफियतीमध्ये सदर बाबी नाकारलेल्या आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकतीवर त्यांच्याच पूर्वजांचा हक्क व ताबा देखील आहे ही बाब नमूद केली आहे. प्रतिवादींनी आपल्या कैफियतीमध्ये पुढे असे कथन केले की,

दि.२३.०२.१९३२ रोजी राजमहंमद सुलतान तर्फे खैरूद्दीन खुदबुद्दीन काझी यांनी अब्दूल सिराज मुजावर यांना २५०/— रूपयास दावा मिळकत व इतर मिळकत कब्जे गहाण दिले होते. त्यामुळे सदर मिळकतीमध्ये अब्दूल व सिराज रहिमान मुजावर यांचा सन १९३२ सालापासून कब्जा होता. अब्दूल रहमान मुजावर हे सन २००५ साली मयत झाले. तसेच त्यांचा भाउ सिराज हे सन २००० साली मयत झाले. अब्दूल यास उस्मान, कदीर, गुलाम असे वारस होते. सिराज यास महामुद असे वारस होते. अब्दूलचा मुलगा उस्मान मयत झालेपासून त्याची चार मुले अल्ताफ, अजीम, असीफ आणि अलीम असे वारसदार होते. सदर मुलांपैकी आलीम हा मयत असून त्यांना दोन मुली नसरीन व तौसिन अशा होत्या. अब्दूल व सिराज यांचेमध्ये फार वर्षापूर्वी वाटप झाले असून इतर मिळकती सिराज यांचे वाटयास गेलेल्या आहेत व वाद मिळकत ही अब्दूल यांचे वाटपात आलेली आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादींची कधीही कब्जे वहिवाट नव्हती. प्रतिवादींनी सन १९३२ साली झालेल्या कब्जे गहाणाचे व्यवहाराबाबत कोणताही दस्तऐवज दाखल केलेला नाही. नि. २८ वरील हक्क पत्रकामध्ये सदर दस्ताचा उल्लेख आहे. परंतू प्रतिवादींनी सदर हक्कपत्राच्या संबंधीत कोणताही दस्त दाखल केला नाही. त्यामुळे कब्जे गहाणाचे व्यवहाराबाबत तपशीलवार म्हणजेच कब्जे गहाण किती दिवसाकरिता झाले होते तसेच सदर गहाणच्या व्यवहारासंबंधी दावा मिळकतीचा ताबा देणेत आला होता की नाही याबाबी न्यायालयाचे रेकॉर्डसदरी पुढे येवू शकलेल्या नाहीत. दुसरी महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादीतर्फे नि. २७ वर खातेउतारा दाखल करणेत आलेला आहे. सदर खातेउतारा हा तपासून पाहता माझया असे निदर्शनास येते की, सन

१९३२—३३ साली दावा मिळकत ही अब्दूल रहिमान मुजावर यांचे नावावरून कमी करणेत आलेली होती. सदर बाबतचा खातेउतारा क्र. ९४८ असा होता. त्यामुळे सदरचा दावा मिळकतीचा कमी झालेला शेरा हा कशामुळे झाला व त्याअनुषंगाने ७/१२ चे रेकॉर्डसदरी नेमके कोणाचे नाव होते याबाबत कोणतेही ७/१२ चे उतारे किंवा ताब्याबाबतचे इतर कोणतेही दस्तऐवज प्रतिवादींनी न्यायालयाचे रेकॉर्डसदरी दाखल केलेले नाहीत.

**१४.** उलटपक्षी वादींनी नि. ७ वर दावा मिळकतीचा सिटी सर्व्हेचा उतारा दाखल केला आहे. सदर उता याचे अवलोकन करता असे दिसून येते की, सन १९३२—३३ सालापासून ते सन १९४५—४६ सालापर्यत संरक्षित कुळ म्हणून बाबू हरी कुदळे यांचे नाव आहे. कुळ व खंड या रखान्यामध्ये देखील बाबु हरी कुदळे यांचे नाव आहे. त्याचप्रमाणे पिके आणि लागनपड या रखान्यामध्ये देखील बाबु हरी कुदळे यांचेच नाव आहे. नि. ८ च्या दावा मिळकतीच्या सर्व्हे नंबर मध्ये देखील बाबु हरी कुदळे यांचे नावाची नोंद ही सन १९५०—५१ पासून ते सन १९६२—६३ सालापर्यत नमूद करणेत आलेली आहे. नि. ९ च्या सिटी सर्व्हेच्या उता—यामध्ये देखील सन १९६३—६४ सालापासून ते सन १९७८—८९ पर्यत बाबु हरी कुदळे यांचेच नावाची नोंद आहे. नि. १०, ११, १२ या ७/१२ च्या उता—यामध्ये देखील बाबु हरी कुदळे यांचेनंतर पुष्पा शिवाजी कुदळे यांचे इतर हक्कासदरी सन १९९९ ते २०१३ पर्यत त्यांचेच नावाची नोंद आहे. नि. १२ च्या ७/१२ च्या उता—यामध्ये पुष्पा शिवाजी कुदळे यांचेच नावाची नोंद असून पिकाच्या रखान्यामध्ये शिवाजी कुदळे यांचे नावाची नोंद आहे. नि. ७ ते १२ वरील उता—यांचे मालक सदरी राजमहंमद

सुलतान तर्फे खैरूद्दीन खुदबुद्दीन काझी यांचे नावाची नोंद आहे. त्यानंतर नि. १० ते १२ च्या भोगावटदाराच्या रखान्यामध्ये पीर मुबारक पीर, राजमहंमद सुलतान तर्फे खैरूद्दीन खुदबुद्दीन काझी यांचे नावाची नोंद आहे. वादींनी दाखल केलेल्या नि. १३ च्या गाव नमुना ८अ च्या खाते उता—यामध्ये पुष्पा शिवाजी कुदळे यांचे नावाची नोंद दर्शविण्यात आलेली आहे. वादींनी दाखल केलेल्या सन १९९१, १९९६, २००३, २००६, २०१०, २०१२ या सर्व करांच्या पावत्यांवर देखील पैसे भरणार म्हणून पुष्पा शिवाजी कुदळे यांचेच नावाची नोंद आहे. नि. १५ वरील फेरफार नं. १७००१ मध्ये दि.०५.१२.७८ सदरी वारसा हक्काने बाबु हरी कुदळे यांचा दि. १५.०९.७८ रोजी मृत्यू झालेमुळे त्यांचेतर्फे एकत्र कुटूंबाचा कर्ता म्हणून शंकरराव बाबुराव कुदळे यांचे नावाची दावा मिळकतीसोबत इतर मिळकतीमध्ये देखील नोंद आहे दिसून येते. नि. १६ वरील फेरफार नं. १९०६८ या उता—याद्वारे शिवाजी बाबुराव कुदळे हे दि.३०.०९.२००९ रोजी मयत झालेमुळे त्यांचे वारस म्हणून त्यांची पत्नी पुष्पा शिवाजी कुदळे तसेच त्यांची तीन मुले गणेश, अविनाश व मनोज यांचे नावाची नोंद झालेली आहे. नि. १७ वरील फेरफार क्र. १८९११ मध्ये देखील प्रत्यक्ष वादींच्या नावाची नोंद झालेली दिसून येते.

**१५.** वादींनी नि. ४/८ लगत वाटणीपत्राचा दस्त दाखल केला आहे. सदरील दस्ताचे अवलोकन करता असे दिसून येते की, दि.२३.०५.८८ रोजी वादी यांचे वडिलार्जीत मिळकतीचे वाटपपत्र करणेत आले. त्यामध्ये संपूर्ण दावा मिळकती शिवाजी बाबुराव कुदळे यांचे नावाने देण्यात आलेल्या आहेत. वरील सर्व दाखल केलेल्या दस्तऐवजावरून

वादींनी वरवर पाहता दावा मिळकतीवरील आपला ताबा हा सन १९३२ पासून ते सन २०१३ या सालापर्यंत ताबा आहे हे सिध्द् केलेले आहे. प्रतिवादींच्या नावाची नोंद सन १९३२—३३ सालीच नि. २७ आणि २८ च्या अनुषंगाने कमी करणेत आलेली आहे. दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध अगर कब्जा व वहिवाटी नव्हती व नाही. दावा मिळकतीचे संपूर्ण रेकॉर्ड विचारात घेता दावा मिळकत सन १९४५—४६ सालापासून बाबू हरी कुदळे कूळ हक्काने वहिवाटीत होते व त्यांचे पश्चात वादी वहिवाटीत होते व आहेत. मयत बाबूच्या पश्चात शंकर आणि मयत शिवाजी यांचेत दि.२३/०५/१९८८ रोजी वडिलोपार्जीत मिळकतींचे वाटप झाले. सदर वाटपाप्रमाणे सदरची मिळकत शिवाजी यांचे वाटपात दिलेली आहे. सबब सन १९८८ पासून मयत हा वादातील मिळकत वडिलोपार्जीत मालकीहक्काने वहिवाटत होता व आहे.

**१६.** प्रतिवादींनी आपल्या कैफियतीमध्ये पुढे असे नमूद केले आहे की, वादीने आपल्या दाव्यासोबत दि.३०.०४.२०१३ रोजीच्या तक्रारी अर्जाची नक्कल दाखल केली आहे. त्यामध्ये वादी हे भुईमुंगाचे पिक काढत होते व त्यावेळेस प्रतिवादी यांनी हरकत केली ही बाब नमूद केली आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, वादींनी कोणतेही भुईमुंगाचे पिक न काढता प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये ज्वारीचे पिक पेरलेले होते. सदर बाब सिध्द् करणेकरिता प्रतिवादींनी जी.डी.ठाकरे सहा फौजदार वाई पोलीस ठाणे यांनी मा.तहसिलदारवाई यांना चाप्टर केस क्र. ७८/१३ दि. ३०.०४.२०१३ रोजीच्या अहवालाची प्रत दाखल केली आहे. सदरील अहवालाच्या प्रतीमध्ये प्रतिवादी हे पूर्वीपासूनच दावा मिळकत कसत आहेत

ही बाब नमूद केली आहे. प्रतिवादींनी सदर अहवालासोबत हसन मकबुल मुजावर, सिकंदर आब्बास बागवान यांची झालेली जबानीची नक्कल देखील दाखल केली आहे. सदर दोन्ही जबाबामध्ये वादी हे स्वत:मार्फत बिपीन सिताराम नायकवडी या इसमाद्वारे दावा मिळकतीची वहिवाट करत आहेत असे दिसून येते. वरील सर्व दाखल केलेल्या अहवालावरून व जबानीवरून प्रतिवादींनी असे सिध्द् करणेचा प्रयत्न केला आहे की दावा मिळकतीचा ताबा हा सन २०१२—१३ मध्ये त्यांचेकडे आलेला आहे. प्रतिवादींनी त्यांचेतर्फे सिकंदर आब्बास बागवान, हसन मकबुल मुजावर, यशवंत कृष्णा वाघ, नारायण यशवंत पीर, साजीद गफार पटेल, ज्ञानोबा महादेव कुदळे, दादासो बाबूराव पवार यांची प्रतिज्ञापत्रे दाखल केली आहेत. सदरील सर्व प्रतिज्ञापत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदरील सर्व व्यक्ती हे दावा मिळकतीच्या लगतचे कब्जेदार आहेत व त्यांचेमार्फत असे सिध्द् करणेचा प्रयत्न करणेत आला आहे की दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा कब्जा आहे. वादीतर्फे दाखल करणेत आलेल्या सर्व दस्तऐवजावरून असे दिसून येते की, वादींच्या नावाची नोंद कुळ म्हणून सन २०१२ सालापर्यंत आहे. प्रतिवादींचा कब्जा दाखविणेकरिता प्रतिवादींनी सन २०१२ सालचे काही दस्तऐवज दाखल केलेले आहेत. सदरील दस्तऐवजावरून असे दिसून येते की, प्रतिवादी हे वैयक्तीकरित्या सदर जमीनीची वहिवाट करत आहेत. चाप्टर केस क्र. ७८/१३ या संदर्भामध्ये हसन मगदुम मुजावर आणि सिकंदर आब्बास बागवान यांच्या जबाबावरून असे दिसून येते की, बिपीन सिताराम नायवकडी यांचेमार्फत प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये मशागत व पाणी देत असतात. याचाच अर्थ असा दिसून येतो की सदरच्या फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४५ अन्वये झालेल्या चौकशीमध्ये दावा मिळकत ही

प्रतिवादीच्या ताब्यामध्ये आहे असे दिसून येते. वरील सर्व परिस्थीतीमध्ये मला येथे मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेले न्यायनिवाडे मी येथे नमूद करू इच्छितो, ते खालीलप्रमाणे....

**In Remniranjan Singh & others V/s M/s Bramjee Jeejeebhoy Pvt.Ltd, Reported in 2006(6) Mh.L.J.95.**

Maharashtra Land Revenue Code (61 of 1966), SS. 149, 150, 2(12), 2(23) and Maharashtra Revenue Record of Rights and Registers Preparation and Maintenance) Rules, 1971, RR. 10 and 13- For entering one's name in the Record of Rights, the applicant has to be a holder, occupant, owner, mortgagee or tenant- Such a right is to be established by showing that his possession of land is lawful or he had come in possession by legal conveyance.

**In Mandali Ranganna & ors V/s T. Ramachandra & Ors, Reported in AIR 2008 Supreme Court 2291.**

(A) Civil Procedure Code (5 of 1908), O. 39, Rr. 1, 2- Injunction- Grant of – Besides consideration of basic elements, Court must consider conduct of parties.

**In Pralhad Jaganath Jawale V/s Sitabai Chander Nikam, Reported in 2011(4) Mh.L.J 137.**

(C) Code Procedure Code, O. 39, RR.1 & 2- Temporary injunction- Grant of- Court is required to consider the three ingredients namely the cannot exercise power of granting temporary injunction mechanically unless existence of three ingredients is established.

**In Fromac Engineering Ltd. V/s Muncipal Corporation of GR.Mumbai, Reported in 2011(4) Mh.L.J. 152.**

(B) Civil P.C. (5 of 1908), O. 39, R. 1- Powers of Court- Court should consider whether prima facie case has been made out by the petitioner which needs adjudication at the trial- Prima facie case should not be confused with prima facie title. (para 41)

प्रतिवादीतर्फे नि. ४० चे कागद यादीअन्वये मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या एक न्यायनिर्णयाची प्रत दाखल केलेली आहे ती खालीलप्रमाणे...

**In Balwant Singh and Another etc V/s Daulat Singh and Ors. Reported in 1997 STPL LE 23765 SC.**

**D-** We may also point out that the trial Court was prepared to accept that factually possession and enjoyment were with Durga Devi, but it held that such possession and enjoyment as one on behalf of the minors in whose favour the mutation was earlier effected on 19-7-54. In view of our conclusion that by mutation the window has not divested herself of title and possession, the erroneous conclusion reached by the Courts below have to be set aside.

१७. वरील सर्व मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने असे दिसून येते की, सन १९५७ सालापासून वादींनी दावा मिळकतीवरील कुळ म्हणून असलेली नोंद सिध्द् केलेली आहे. एवढेच नव्हे तर सन १९३२—३३ सालापासून अखंडितरित्या सन २०१२ सालापर्यत वादींनी दावा मिळकतीवरील आपली कुळ म्हणून असलेली नोंद सिध्द् केलेली आहे. प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशान्वये कुळ म्हणून असलेली नोंदीचा अर्थ ताबा असा होत नाही. त्यामुळे वादींचा दावा मिळकतीवर ताबा आहे ही बाब वादींनी स्वतंत्र तोंडी तसेच कागदोपत्री पुराव्यान्वये सिध्द् करणे गरजेचे आहे. वादींतर्फे असा कोणताही तोंडी तसेच कागदोपत्री पुरावा न्यायालयाचे रेकॉर्डसदरी आणलेला नाही की, जेणेकरून ही बाब सिध्द् होईल की,

वादींच्या पुर्वजांमध्ये किंवा वादींमध्ये प्रतिवादीच्या पुर्वजांसोबत किंवा प्रतिवादींसोबत कोणता कुळाचा करारनामा झालेला होता. सदरील कुळाच्या करारनाम्यान्वये वादींचे पूर्वज किंवा वादी हे प्रतिवादींच्या पूर्वजांना किंवा प्रतिवादींना खंड देत होते. वादी दावा मिळकतीमध्ये सन १९३२ सालापासून वहिवाट करून त्यामध्ये पिके घेवून त्याची जोपासना करत होते. वादींतर्फे असा कोणताही कागदोपत्री पुरावा आणला नाही की, जेणेकरून ही बाब सिध्द् होईल की, सन १९३२ सालापासून दावा मिळकतीमध्ये अखंडीतरित्या ताबा आहे. वादींनी ही बाब देखील सिध्द् केली नाही की, प्रतिवादींनी वादींचे कब्जाला हरकत अडथळा केलेला आहे व त्यामुळे वादींचे पैशात न भरून येणारे नुकसान झालेले आहे. कायद्याचा तराजु हा प्रतिवादींच्या बाजूने झुकतांना दिसून येत आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये मालकी हक्काबाबत कोणताही मुद्दा वादींनी नाकारलेला नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारात्मक देवून मुद्दा क्र. ४ साठी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१.** अर्ज नामंजूर करण्यात येतो.

**२.** खर्चाची बाब अंतिम न्यायनिर्णयावेळी गणली जाईल.

(पंकज प. नायगांवकर)
दि. २८/०४/२०१४ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, वाई.